# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk2a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक**

क्रमांक : २अ/एडीएम/२०१६/१११३
दिनांक : 12 AUG 2016

**विषय : शै.व.२०१६-१७ च्या प्रवेश प्रक्रियेबाबत..**

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विनाअनुदानीत संस्थांना असे कळविण्यात येते की, ज्या संस्थाचा समावेश शै.व.२०१६-१७ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात आलेला आहे. अशा संस्थेतील सक्षम प्राधिकरणाच्या स्तरावर घेतल्या गेलेल्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट जागेपैकी रिक्त राहीलेल्या जागा "Against CAP Vacancies" म्हणुन संस्था स्तरावर विहीत नियमानुसार भरता येतील, अशी तरतुद प्रवेश नियमात करण्यात आलेली आहे. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.१२/०८/२०१६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार ज्या संस्थाना दि.०५/०८/२०१६ पर्यंत संबंधित प्राधिकरणाची मान्यता/ संलग्नीकरन प्राप्त झाले आहे, अशा संस्थांच्याबाबतीत सक्षम प्राधिकरणामार्फत राबविल्या गेलेल्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये अंतर्गत संस्थेतील एकुण मंजूर जागांपैकी एकही जागा समाविष्ट नसल्यास एकही जागा "Against CAP Vacancies Seats" म्हणुन गणता येणार नसल्याने, अशा प्रकरणी केवळ संस्था स्तरावरील २० टक्के कोटयातील जागा संस्था स्तरावर भरण्यात याव्यात. त्याव्यतिरीक्त जागा संस्था स्तरावरून भरल्यास असे प्रवेश अनधिकृत समजले जातील.

तसेच ज्या संस्थांना दि.०५/०८/२०१६ नंतर संबंधित प्राधिकरणाची मान्यता/संलग्नता प्राप्त झाली असेल अशा संस्थाना शै.व.२०१६-१७ मध्ये प्रवेश करता येणार नाहीत.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत : सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांना माहीती व पुढील कार्यवाही करीता. त्यांना कळविण्यात येते की वरील बाब त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांच्या निदर्शनास आणुन दयावी.